# व्यक्ती-वल्ली - प्रभाकर-वैभवी किनी

नमस्कार..!
मंडळी, आजचा माझा खास लेख जिने मुंबईत मराठी नाट्यसृष्टी आपल्या अभिनयाने गाजविली होती व जिने २०१७ मध्ये ‘रंगदीप’ दिवाळी अंकाच्या संपादनाची यशस्वी जबाबदारी सांभाळली होती त्या अष्टपैलू 'किनी प्रभाकर' हिच्यावर आहे. तो वाचल्यावर तुम्हाला कळेल की, ती किती श्रेष्ठ आहे. सवडीने वाचून तृप्त झाल्यावर मला आपला अभिप्राय कळवा. किनी प्रभाकरला मिळालेली ती ‘दाद'च असेल. धन्यवाद. मंडळी, ‘प्रभाकर'चा अर्थ सूर्य हे आपण जाणतां. त्याची फोड येथे करायला नको. असो.
आपला स्नेहांकित,
जयंत.

ता. क. सांगायला अभिमान वाटतोय की, मी हा लेख लिहिला तेव्हा किनी मंडळाच्या कार्यकारिणीवर कार्यान्वित होती. नंतर दोन वर्ष मंडळाची प्रेसिडेंट झाली. त्या दोन वर्षाच्या यशस्वी कारकीर्दीनंतर पुढील वर्षी २०२०ला साजरा होणाऱ्या मंडळाच्या सुवर्णमहोत्सवी वर्षासाठी किनी पुनः बिनविरोध मंडळाची प्रेसिडेंट झाली. तेव्हा मंडळी, किनी, तिचे सहकारी व सभासदांच्या आशिर्वादाने आमच्या मंडळाचा सुवर्णमहोत्सव निश्चित दणक्यात साजरा होईल यात वाद नाही. त्याबद्दल सदीच्छा व्यक्त करतो. Happy 2020..!

***Sharing is Caring,***
***Courtesy is Contagious &***
***Timing is of Essence.***

Please share this article to others, if possible. Thanx.

---

# प्रभाकर-वैभवी किनी




*१) स्वागत तत्पर किनी प्रभाकर... २) साहित्यिक कलाकृतीचं उठावदार प्रतीक. २०१७चा 'रंगदीप' दिवाळी अंक... ३) त्या अंकाची संपादिका किनी... ४) 'रंगदीप' दिवाळी अंकासह मी व किनी...*

न्यू यॉर्क महाराष्ट्र मंडळात हंसरा चेहऱ्याची चुणचुणीत, आनंदी, लाघवी, मॅचिंगसह भारी साडी नेसलेली, त्याला शोभतील अशा दागिन्याने नटलेली, हातात कॅमेरा घेऊन कार्यक्रमाला येणाऱ्या सर्व सभासदांना नमस्कारासह स्वागत करून त्यांचे फोटो काढणारी व मंडळाच्या कार्यकारिणीत काम करणारी उत्साहमूर्ती पहिली आणि पहिल्या भेटीतच तिनं आम्हाला जिकलं होतं. कारण, बोलतांना तिचं अस्खलित मराठी वाखाणण्यासारखं होतं. तसचं तिच्या वागण्यातून दिसणारा आदर हा सुसंस्कृत होता. हे जाणवलं व भावलं. थोडक्यात, तो थाट तिला शोभून दिसत होता. त्या सुस्वरूप मुलीचं नांव आहे, किनी प्रभाकर. न्यू यॉर्कच्या महाराष्ट्र मंडळात स्टेजवर येऊन यशस्ववीपणे सूत्र हातात घेऊन साधे चार मराठी शब्द बोलणारी या आधी मंडळाच्या कार्यकारिणीत (कांही वर्ष) कुणीही व्यक्ती नव्हती. ती परंपरा या मंडळाच्या सेक्रेटरी किनी प्रभाकरने बाजूला करून पहिल्या भेटीतच आम्हा सर्व प्रेक्षकांना-सभासदांना आनंदाचा धक्का दिला होता. अर्थात, तो अभिनंदनीय व अपेक्षित होता. नंतर किनीचा व आमचा अधिक परिचय होत गेला, ओळख वाढली आणि त्याचं घरगुती स्नेह्यात-नात्यात रूपांतर व्हायला वेळ लागला नाही. आम्ही जेव्हा किनीला पाहिले होतं तेव्हा मनात आलं होतं की, ही सुंदरी एखाद्या नटीसारखी दिसते, ती नटी तर नसेल..? आणि आमचा तर्क खरा ठरला होता. किनी ही सुप्रसिद्ध अभिनेत्री व कलाकार होती नव्हे, आहे..!



*१) वंश' साठी उत्कृष्ठ अभिनेत्रीचं महाराष्ट्र राज्य पदक घेताना किनी... २) डॉ. मोहन आगाशे यांच्या 'अस्तु' चित्रपटाच्याच्या न्यू यॉर्क येथे झालेल्या प्रीमियरला डॉ. मोहन आगाशे व किनी... ३) जयवंत दळवी लिखित 'संसारगाथा' नाटकात रोहिणी हट्टंगडी आणि किनी... ४) नाटक 'भ्रमाचा भोपळा' मध्ये किनी... खाली: १) दूरदर्शन मालिका 'रात'... २) नाटक 'कार्टी काळजात घुसली'... ३) नाटक 'लफडं सोवळ्यातलं' मध्ये मोहन जोशी व रमाकांत देशपांडे यांच्यासोबत किनी...*



किनीच्या परिचयाने लवकरच 'किनी' ही आमची 'किनीबेटी' झाली आणि खास करून मला माझ्या वडिलांची आठवण झाली. माझे वडील (प्रा. वि. ह. कुळकर्णी) हे इंग्रजीचे नामवंत प्राध्यापक व मराठी साहित्य क्षेत्रात सुप्रसिद्ध लेखक म्हणून सर्वपरिचित होते. त्यामुळे आमच्या घरी साहित्यिक, लेखक व विद्यार्थ्यांचा सदैव राबता असे. सांगायचा मुद्दा हा की, हे सर्वजण आदराने वडिलांचा सल्ला व आशिर्वाद घ्यायला घरी येत असत. आज नवी पिढी जुन्या अनुभवी पिढीचा आदर करीत नाहीत. त्यांचा सल्ला घेणं तर सोडाच परंतु, त्यांना संपर्कही करीत नाहीत. हे सर्व खेदजनक आहे. आम्ही खरे कोण आहोत याचा जेव्हा किनीला पत्ता लागला तेव्हा, आमचे आशिर्वाद व अनुभव घ्यायला ती प्रथम आमच्या घरी आली होती. या तिच्या मनाच्या मोठेपणाचा आम्हाला मनस्वी आनंद झाला होता. विनयशील

किनीच्या भेटीतून आम्हाला तिच्या अनेक अष्टपैलू गुणांची, सुप्त कलांची, कर्तबगारीची व व्यवसायाची पूर्ण कल्पना आली आणि आम्ही चाट पडलो. कारण, मुंबईत असतांना कलागुणसंपन्न किनीने नाट्यसृष्टी, दूरदर्शन, रेडिओ व जाहिरात क्षेत्रही गाजविलं होतं.



*१) हिंदी नाटक 'स्पार्टाकस', राजकुमारी हेलेना च्या भूमिकेत किनी... २) हिंदी नाटक 'कबीरा खड़ा बाज़ार में' कबीर पत्नी च्या भूमिकेत किनी... ३) 'संसारगाथा' या जयवंत दळवी लिखित मराठी नाटकात सखाराम भावे, यशवंत दत्त, रोहिणी हट्टंगडी, अजित भुरे सोबत वेणू च्या भूमिकेत किनी... ४) 'बोल बाबी बोल' मराठी नाटकात प्रदीप कबरे सोबत प्रतिमेच्या भूमिकेत किनी... खाली: १) नाटक 'भ्रमाचा भोपळा' मंगेश कदम सोबत किनी... २) दूरदर्शन नाटक 'खोटं कोण बोलतंय' मध्ये किनी... ३) नाटक 'भ्रमाचा भोपळा', राजा गोसावी यांच्यासोबत किनी...*



गेल्या वर्षी २०१६च्या 'रंगदीप' दिवाळी अंकाची सहसंपादिका म्हणून किनीचे नांव वाचले तेव्हाच ओळखलं की, किनीच्या संपादनाखाली २९१७चा 'रंगदीप' दिवाळी अंक उत्तम साहित्याने परिपूर्ण असा निघणार. आणि अगदी तसंच झालं. यंदाचा २०१७चा 'रंगदीप' दिवाळी अंक, साहित्यिक व कलात्मक दृष्ट्या दर्जेदार झाला आहे. तसेच, या अंकाचे किनीने लिहिलेले संपादकीय नेहमीप्रमाणे-पूर्वीप्रमाणे क्लीष्ट नसून अत्यंत वाचनीय, उद्बोधक, कल्पक, बौद्धिक व प्रभावी आहे. त्याचबरोबर किनीच्या

विचारांचे प्रतिबिंब त्यात दिसून येतं. संपादक म्हणून अतिशय अवघड जबाबदारी किनीने उत्तमपणे सांभाळली आहे यात शंका नाही. ही संपादनाची जबाबदारी सांभाळण्या आधी कांही महिन्यापूर्वी माझ्याकडील सर्व ‘रंगदीप दिवाळी अंक व संबंधित मराठी साहित्य घेण्यासाठी किनी आमच्याकडे आली होती. हे येथे नमूद करण्याचे कारण असे की, माझा 'रंगदीप’ दिवाळी अंकाचा गेली २६ वर्ष असलेला अनुभव, विचार व सल्ला तिला हवा होता. मंडळी, किनीही या क्षेत्रात अनुभवी होती व आहे. पण, आमच्यासारख्या निवृत्त झालेल्या अनुभवी व्यक्तींचा आदर ठेवून, मान देऊन हाती घेतलेला अंक पारंपारिकरित्या कसा दर्जेदार निघेल याचे तिने योग्यपणे जबाबदारीसह पाऊल उचलले होते व त्याची दखल घेतली होती हे कौतुकास्पद होतं. मंडळी, मी वर माझ्या वडिलांची मला आठवण कां लिहिली ते एव्हाना समजलं असेल. असो.



*मॉडेलिंगच्या विश्वातील किनीच्या सौंदर्याची विविध स्वरूपातील अत्यंत बोलकी व लक्षणीय रूपें...*












*सुप्रसिद्ध कंपन्यांच्या जाहीरातीत मॉडेल म्हणून किनी... खाली: किनीने अभिनयात मिळविलेल्या पारितोषिक विजेत्या नाटकांच्या उल्लेखनीय जाहिराती...*




मुंबईत असतांना किनी ही अभिनेत्री होती. किनीने प्रसिद्ध दिग्दर्शकांच्या हाताखाली निरनिराळ्या नाटकांतून उत्कृष्ट अभिनयाने नाट्यसृष्टी गाजविली होती. ‘खोटं कोण बोलतंय' या सुरुवातीच्या टीव्ही वरच्या नाटकात किनीने 'सविता'ची अवघड भूमिका केली होती. वृत्तपत्रातून प्रसिद्ध झालेल्या त्या नाटकाच्या अभिप्रायात म्हटलंय की, *“सविता’ची भूमिका करणारी किनी प्रभाकर ही भविष्यात नांव कमवेल यात शंकाच नाही. तिचा चेहरा बोलका आहे. अभिनयाची जाण चांगली आहे. तिचा आवाज, तिचे स्पष्ट शब्दोच्चारही भूमिका करायला योग्य आहेत. ‘सविता'च्या भूमिकेत किनीला अभिनयाचा भरपूर वाव होता. आणि उत्तम भूमिकेतून त्याचा तिने चांगला उपयोग केला. हे नाटक ‘सविता'च्या भूमिकेने प्रेक्षणीय ठरले...”*

तसेच, 'वय वर्ष साडे सतरा' या नाटकाच्या प्रेस रिपोर्ट मध्ये 'माधुरी'चे काम करणाऱ्या किनीबद्दल लिहिले आहे. *“या नाटकामध्ये सर्वोत्कृष्ट भूमिका सादर केली ती ‘माधुरी'ची भूमिका करणाऱ्या किनी प्रभाकरने. 'माधुरी'ची तिची एंट्री कांहीशी आश्चर्यजनक आहे. पण तिथूनच ती प्रेक्षकांना जिकते. ‘माधुरी’च्या भूमिकेतून तिने साकार केलेल्या निरनिराळ्या स्वभावांचे हावभाव, वैशिष्ट्य, चढउतार, दृष्टीक्षेप, स्मितहास्य व संवादिक फारच अप्रतिम आहे. या गुणी अभिनेत्रीने ‘माधुरी' सुंदर रंगविली आहे. प्रेक्षकांनी हे हंसरे खेळकर नाटक केवळ किनीच्या अभिनयासाठी तरी*

*पाहायलाच हवं...”*











*इंगजी तसेच, नामवंत मराठी मासिकांच्या मुखपृष्ठावर व जाहिरातीत किनी...*










मुंबईत वाढलेल्या किनीचा प्रवेश अभिनय क्षेत्रात योगायोगाने झाला होता. कॉलेजच्या पहिल्या वर्गात शिक्षण घेत असतां, एक फोटोग्राफरने तिला मॉडेलिंगची ऑफर दिली होती. आणि मॉडेलिंगबरोबर इतर क्षेत्रात किनीचा यशस्वी प्रवास सुरु झाला व मग तिला कधीच मागे वळून पाहावे लागले नव्हते. आज पर्यंत किनीने रंगभूमीवर (कमलाकर सारंग यांनी किनीला दिलेला नाटकातील पहिला ब्रेक) ’बोल, बाबी बोल..!’, ‘शपथ तुला जिवलगा’, ‘पिंजरा’, रमल रफ़ू’, ‘घोडा व वंश’, ‘वय वर्ष साडे सतरा’, 'संसारगाथा', 'चारचौघी', 'लफडं सोवळ्यातलं', 'भ्रमाचा भोपळा' या मराठी आणि 'स्पार्टाकस', कबीर, 'खडा बाजार में' व 'अलबेला अलबेली’ या हिंदी नाटकांतून यशस्वी भूमिका केल्या होत्या. त्याचप्रमाणे दूरदर्शन, चित्रपट व डबिंग या

माध्यमातूनही किनीने भूमिका साकारल्या होत्या. त्या अशा: ‘दूरदर्शनवर’, ‘ज्ञानदीप’, व ’खोटं कोण बोलतंय’ ही नाटकं. तसेच, ‘छोटे-बडे’, ‘बंदिनी’, ‘असे पाहुणे येती’, ‘गोष्टी वेल्हाळ वेल्हाळ’, ‘अभिनय’, ‘घर की बात', 'वरात', 'हम पंछी एक चाल के', 'काळोख' व 'हम पाँच' या दूरदर्शन वरील मालिका. आणि L. I. C., भारतीय विद्यापीठ भवनच्या डॉक्युमेंटरी फिल्म्स केल्या आहेत. त्याबरोबर रेडिओ स्पॉट व २५ जाहिरातीही केल्या आहेत. यावरून किनीच्या व्यवसायिक व यशस्वी कर्तृत्वाची कल्पना येईल.

रंगभूमी व सिनेमा ही दोन भिन्न परंतु, प्रभावी माध्यमं आहेत. रंगभूमीवर काम करणं हे सर्वात कठीण. लाईव्ह प्रेक्षकांसमोर रंगभूमीवरील कलाकारांना हांव-भावांसह जिताजागतां अभिनय करावा लागतो. त्यात थोडीशी चूक झाली तर चालत नाही. पण हे मर्यादित माध्यम आहे. त्याच्या उलट मास माध्यम असलेल्या सिनेमात काम करणाऱ्यांना भूमिका उत्तम होईपर्यंत बराच वाव असतो. चुका झाल्या तर त्या दुरुस्त करतां येतात. त्यामुळे रंगभूमीवरील काम करणारे बरेचसे कलाकार चित्रपटसृष्टीतून गाजले होते. शिवाय, अभिनयाबरोबर तुमचं पाठांतर व स्मरणशक्तीचं आकलन असणं तेव्हडंच महत्वाचं असतं. थोडक्यात, नुसतं सुंदर दिसणं आणि अभिनय ह्या दोन भिन्न गोष्टी आहेत. त्यामुळे मी स्टेजवर-नाटकात भूमिका करणाऱ्या कलाकारांना श्रेष्ठ मानतो. मी लिहिण्याचे कारण असे की, किनीचे साहित्यिक व कलाकाराचे गुण समृद्ध-परिपूर्ण आहेत. या दोन्ही प्रभावी माध्यमाचा परिणामात्मक योग्य उपयोग करून तिने रंगभूमी गाजविली. किनीने अशोक समेळ, वामन केंद्रे, विजय केंकरे, मंगेश कदम, चंद्रकांत कुलकर्णी, विनय आपटे व इतर अनेक प्रसिद्ध दिग्दर्शकांच्या हाताखाली नाटकातून यशस्वी भूमिका केल्या होत्या. तेव्हा, किनी जर आज भारतातच असती तर तिने भारतीय चित्रपटसृष्टीही निश्चित गाजवली असती यात वाद नाही. त्याचबरोबर आपला स्वतःचा व्यवसाय सांभाळून किनीने अनेक प्रसिद्ध जाहिरातींसाठी मॉडेलिंगही केले होते. Although 'Kini' means 'Mini' परंतु, ही 'मिनी' त्याला अपवाद आहे. Besides, she is full of energy and expressive..!

नेहमी प्रसिद्धीच्या प्रसिद्धीच्या वलयात व प्रकाशझोतात राहाणारे असंख्य कलाकार मी प्रत्यक्ष जवळून पहिले आहेत. तसेच, अनेक नामांकित फोटोग्राफर माझ्या परिचयाचे होते. तसेच,
या स्वप्ननगरीत वावरतांना कलाकार आपला सर्व वेळ (२४ तास-सात दिवस) अतिशय श्रमपूर्वक खर्च करतात. त्यातून त्यांना देशो-देशी करावा लागणारा दिवस रात्र प्रवास. या गोष्टींचीही मला कल्पना आहे. कारण आमच्या आईची स्नेही व अभिनेत्री कुसुम कुलकर्णी, माझ्या थोरल्या बहिणीची मैत्रीण सुप्रसिद्ध अभिनेत्री हंसा वाडकर, तिचे पती व देखणे नट राजन जावळे, पुण्याच्या PDAचे नामवंत नट जयंत धर्माधिकारी, नाटककार व तत्सम क्षेत्रातील इतर कलाकार आमच्या घरी येत असत. त्याचप्रमाणे, सुप्रसिद्ध अभिनेत्री शांता जोग यांचा मोठा मुलगा श्री जोग हा माझा शाळकरी मित्र असल्याने त्यांचा परिचय होता. त्यामुळे या क्षेत्रात त्यांना आलेले त्यांचे अनुभव आम्ही जाणून होतो. शिवाय, त्यांनी ते शब्दांकितही केले आहेत. तात्पर्य असं, या द्रुष्टीआडच्या सृष्टीत अनेक अडचणींना तोंड देऊन आपल्या क्षेत्रात यशस्वी होणं हे सोपं काम नाही. सौंदर्याबरोबर विविध विषयांची आवड, त्याचे वाचन, सर्व भाषेवर प्रभुत्व, त्याचा अभ्यास, आत्मनिरीक्षण, आत्मविश्वास, महत्वाकांक्षा, ध्येय व जिद्द इत्यादी गुणांची आवश्यकता असल्याशिवाय कुणीही कलाकार श्रेष्ठ होत नाही अथवा यशाचे शिखर गांठित नाही. मात्र, किनीने या गुणांसह त्यात यश मिळवलं यात शंका नाही.








*किनीच्या बोलक्या प्रतिमा... खाली: सर्वात उजवीकडे किनी व तिची दोन गुणी मुलं, मुलगी मलाईका आणि मुलगा रोहन...*



बरं, आपल्या धांवत्या जीवनातून वेळ काढून कर्तव्यदक्ष व साक्षेपी किनी कधीही रिकाम्या हाती आमच्या घरी येत नाही. आल्यावर प्रथम आमच्या पाया पडणार व नंतर मिठी मारणार. तेव्हा आमचे डोळे सानंदाश्रूंनी पाणावतात. ही प्रथा व हे संस्कार अमेरिकेतच काय पण, हल्ली भारतामधील सुशिक्षित घराण्यातही दिसून येत नाहीत. किनी मात्र याला अपवाद ठरली. हे आमचं भाग्य. भेटायला वेळ मिळाला नाही तर, फोनवरून संपर्क व संवाद साधणारी, कुणालाही अभिमान वाटेल अशी ही आमची कर्तबगार, कलागुणसंपन्न व अष्टपैलू किनीबेटी. अभिमानाची बाब म्हणजे, किनीचे वडील हे Ph.D. in Chemistry, प्राध्यापक तर, आई Food analyst with Distinction in Chemistry, होती. त्यामुळे घरातूनच उत्तम शिक्षणाचं बाळकडू तिला मिळालं होतं. याच जोरावर किनीने आपल्या व्यवसायात व जीवनात यशाचं शिखर गाठलं. आज मुलगी मलाईका आणि मुलगा रोहन या गुणी व हुशार मुलांसह ती संसाराचा भार सांभाळून आहे.

मराठी माणूस हा नाट्यप्रेमी आहे. त्यामुळे पूर्वी आपल्या मंडळानी मंडळाच्या कार्यकारिणीतील कलाकारांनी सभासदांसह आपला अमूल्य वेळ खर्च करून अनेकोत्तम अनके दर्जेदार नाटकें कुठलीही अपेक्षा न करतां आनंदाने सादर केली होती. आणि करीत होते. आज ती परंपरा अंधारात व विस्मरणात गेली आहे. आज आपल्याकडे नव्या-जुन्या पिढीतील अनेक कलाकार आहेत. तो सुवर्णकाळ व तो परंपरा पुनः मंडळातून परत यावी. मग त्यात मिश्रित संस्कार आले तरी येथील रसिक प्रेक्षक

त्याचं सहर्ष स्वागतच करील. हे निर्वाद सत्य होय. या सर्व व्यापातून किनी ‘रंगदीप’ दिवाळी अंकाची परंपरा व ज्योत अखंड तेवत ठेवील, पुढे महाराष्ट्र मंडळ न्यू यॉर्कचं अध्यक्षपद भूषवेल आणि २०२० मध्ये मंडळाचा होणारा सुवर्णमहोत्सव कळसाला नेईल, हे त्रिवार सत्य..!

तेव्हा मंडळी, अष्टपैलू किनीचे कलात्मक गुण मर्यादित न राहतां, अमेरिकेच्या व्यासपीठावर व रंगभूमीवर अभिनयासह साहित्य क्षेत्रातही आवड असलेल्या उत्साहमूर्ती किनी प्रभाकरचा प्रभाव सूर्यप्रकाशित व्हावा, तिने एखादी नाट्य संस्था स्थापन करावी, तिच्या अभिनयाचं कलादर्शन घडावं, ही माझी हांक (किनीसह) व आवाहन वेळ निघून जाण्यापूर्वी सर्वांनी ऐकावी या भावनेने आपल्या मराठी समाजाला किनीची ओळख व्हावी म्हणून करून दिलेला हा माझा प्रामाणिक प्रयत्न. हे सर्व फलद्रुप व्हावं. यासाठी आमची मदत, आमच्या सदिच्छा व शुभेच्छा किनीच्या सदैव पाठीशी असणारच. यात शंका नाही. त्याबद्दल आमच्या किनीबेटीला लाख लाख शुभेच्छा व सदिच्छा..!

Kini’s Proud Achievements:

1) Best Actress - Maharashtra state medal-Marathi Natak-Vansh
2) Best Actress - Urdu Academy-Kabila Khada Bazar Me
3) Have worked with well known directors - Sai Paranjape, Vijaya Mehta, Kamlakar Sarang, Mangesh Kadam, Chandrakant Kulkarni, Waman Kendre, Dilip Kolhatkar, Vinay Apte, Achut Deshingkar, Ashok Samel, Sudha Karmarkar, Vijay Kenkre, Dilip Kolhatkar, Karuna Dev, Bal Kudtarkar in various Marathi & Hindi serials as well as Natak and Radio Commercials for 10 years.
In Hindi - Shafi Inamdar, Dinesh Thakur, Atul Tiwari, Firoz Abbas Khan and Madhushree Datta.

4) Did Voice culture course at NCPA with Dr. Ashok Ranade and Natya Shibir with Vasudev Palinode.

5) किनीने उत्तम भूमिका केलेलं नाटक ‘कार्टी काळजात घुसली’ येथे पाहावे:
https://www.youtube.com/watch?v=p_FgFnDnFGc&feature=youtu.be

टीप: आजवर मला अनके क्षेत्रातील नामवंत व इतर व्यक्तींवर शब्दचित्रे लिहिण्याचा योग्य आला होता. परंतु, नाट्यक्षेत्रातील अभिनेत्रीवर शब्दचित्रं लिहिण्याचा हा पहिलाच योग. त्याबद्दल मी किनीचा व तिने दिलेल्या सहकार्याचा मनापासून आभारी आहे.

जयंत विठ्ठल कुळकर्णी.
jvkny1@gmail.com

---